महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

E-mail ID : desk23.dgoffice@mahapolice.gov.in

ई-मेल द्वारे /तात्काळ

क्र.पोमसं/२३/५४/सर्वोत्कृष्ट पोलीस ठाणे/५१९/२०१९ मुंबई, दिनांक :- /०६/२०२३
०४/०६/२०२३

**विषय** :- सर्वोत्कृष्ट पोलीस ठाणे-२०२१ घोषित करण्याबाबत.
(Best Police Station-2021)

*****

सन २०१६ मध्ये झालेल्या DGsP / IGsP कॉन्फरन्समध्ये, निकोप स्पर्धा वाढावी, तसेच कायदा व सुव्यवस्था, गुन्हे प्रतिबंध, दोषसिध्दी यामध्ये सुधारणा व्हावी यासाठी देशपातळीवर १० सर्वोत्कृष्ट पोलीस ठाण्यांची (Best Police Station) निवड करण्याबाबतचा निर्णय केंद्रीय स्तरावर घेण्यात आला असून त्याप्रमाणे सर्वोत्कृष्ट पोलीस ठाण्यांची निवड भारत सरकार, गृह मंत्रालयाकडून करण्यात येते.

२. **यास्तव** सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस ठाण्यांचा विचार करुन देशपातळीवर सर्वोत्कृष्ट पोलीस ठाण्यांच्या निवड प्रक्रियेत महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस ठाण्यांचा समावेश होण्याच्या दृष्टीने, तसेच राज्यातील पोलीस ठाण्यांची कार्यक्षमता आणि कामगिरी वाढविणे, गुणवत्ता वाढविणे, दिलेल्या मर्यादेमध्ये उत्कृष्ट पध्दतीने काम करणे, तसेच गुन्हेगारीला प्रतिबंध आणि गुन्हयाचा तपास, आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने संबंधित पोलीस अधिकारी / अंमलदार यांना प्रोत्साहित करणे, इत्यादी हेतू साध्य करण्यासाठी सन २०२० या वर्षापासून राज्य पातळीवर सर्वोत्कृष्ट ५ पोलीस ठाण्यांची निवड करुन सदर पोलीस ठाण्यांना सन्मानचिन्ह व रोख बक्षिस प्रदान करण्यात येत आहेत.

**३.** त्याच धर्तीवर सन २०२१ या वर्षातील कार्यमुल्यांकनाच्या बाबतीत राज्य पातळीवर सर्वोत्कृष्ट पोलीस ठाणे स्पर्धेकरीता निश्चित करुन दिलेले गुणांकन, निकष व नियमावली इ. बाबी बारकाईने विचारात घेवून घटकातील सर्व पोलीस ठाण्यांचे मूल्यमापन करुन त्यापैकी २ उत्कृष्ट पोलीस ठाणे निवडण्यासाठी जिल्हा स्तरावर समिती, तसेच परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस आयुक्त यांनी घटक निहाय / परिमंडळ निहाय प्राप्त प्रत्येकी २ पोलीस ठाण्यांमधून परिक्षेत्र / आयुक्तालय स्तरावर उत्कृष्ट २ पोलीस ठाण्यांची निवड करण्यासाठी परिक्षेत्रीय स्तरावर समिती, आणि परिक्षेत्र निहाय व आयुक्तालय निहाय प्राप्त उत्कृष्ट पोलीस ठाण्यांमधून ५ सर्वोत्कृष्ट पोलीस ठाणे निवडण्यासाठी राज्य स्तरावर समिती इ. समित्या गठीत करण्यात आल्या होत्या.

२/-

४. **एकंदरीत** सन २०२१ या वर्षातील कार्यमुल्यांकनाच्या बाबतीत परिक्षेत्र निहाय व आयुक्तालय निहाय प्राप्त उत्कृष्ट पोलीस ठाण्यांमधून खालीलप्रमाणे क्रमनिहाय सर्वोत्कृष्ट ५ पोलीस ठाण्यांची शिफारस राज्य स्तरावरील समितीने केलेली असून सदर ५ पोलीस ठाण्यांना सर्वोत्कृष्ट पोलीस ठाणे-२०२१ म्हणून घोषित करण्यात येत आहे.

१) शिवाजीनगर पोलीस ठाणे (कोल्हापूर)
२) देगलुर पोलीस ठाणे (नांदेड)
३) वाळुंज पोलीस ठाणे (छत्रपती संभाजी नगर शहर)
४) अर्जुनी मोर पोलीस ठाणे (गोंदिया)
५) राबोडी पोलीस ठाणे (ठाणे शहर)

Sanjay 30/06/23

**( संजय सक्सेना )**
अपर पोलीस महासंचालक (का. व सु.)
पोलीस महासंचालक, म. राज्य, मुंबई यांचेकरीता

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (शहरे / लोहमार्ग) (बृहन्मुंबई / ठाणे शहर (सस्नेह))
सर्व पोलीस अधीक्षक (जिल्हे / लोहमार्ग)
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

प्रत,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.(सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके / आ.गु.शा. / वाहतूक / विशेष कृती / ना.ह.सं., महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी कृपया सर्वोत्कृष्ट पोलीस ठाण्यांसाठी निवड करण्यात आलेल्या उपरोक्त नमूद पोलीस ठाण्यांना प्रत्येकी रुपये ५०,०००/- बक्षिस अदा करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अपराध प्रतिबंध, महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र सायबर, मुंबई
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक ९ व ३६.
पोलीस निरीक्षक, एपीए शाखा, पोमसं कार्यालय, मुंबई.

D:Talekar/General Lette r 3